**<u>प्रेसनोट</u>** **दि. 05/03/2026**

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांच्याकडून महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, पुणे येथील जिल्हा व्यवस्थापक व सहाय्यक लेखा अधिकारी यांच्यावर लाच मागणी करून लाच स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 चे कलमान्वये |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 44 वर्ष |
| **आरोपी नाव व कार्यालय** | 1) महेंद्र मलेशा माने वय 56 पद- जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले, मागासवर्गीय विकास महामंडळ, पुणे तात्पुरता पत्ता- पी जी बॉईज हॉस्टेल,कॉट नं. 1 पुणे-आळंदी रोड, विश्रांतवाडी, पुणे, मूळ पत्ता-108,मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर, **(वर्ग – 2)**<br>2)संतोष नामदेव शिंदे वय- 55 पद - सहाय्यक लेखा अधिकारी,महात्मा फुले,मागासवर्गीय विकास महामंडळ, पुणे रा.ठी. सन गौरी अपार्टमेंट, कुंबरे टाऊनशिप, फ्लॅट नंबर 36, कोथरूड, पुणे. **(वर्ग – 3)** |
| **सुरवातीस मागणी केलेली लाच रक्कम** | **रू. 20,000/- (वीस हजार रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 15,000/- (पंधरा हजार रूपये)** |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाच रक्कम** | **रू. 15,000/- (पंधरा हजार रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 04/02/2026, 05/02/2026 |
| **सापळा दिनांक** | दि. 05/03/2026 |
| **ठिकाण** | पुणे कॅफे समोर, अपोलो चौक, रस्ता पेठ, पुणे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री.प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9923444998) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. खंडेराव रंजवे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9923486428) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे एक फोटोग्राफर असून त्यांनी त्यांच्या फोटोग्राफी व्यवसायाकरीता आवश्यक असणारा 3,08,990/- रूपये किमतीचा कॅमेरा खरेदी करण्यासाठी कॅनरा बँकेमध्ये कर्ज प्रकरण केले होते. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाकडून मागासवर्गीय लोकांना व्यवसायासाठी 50 हजार रूपयांपर्यंत अनुदान देण्यात येत असते म्हणून तक्रारदाराने त्यांच्या फोटोग्राफी व्यवसायकरता लागणा-या कॅमेरा खरेदीसाठी 50 हजार रूपयाचे अनुदान मिळावे म्हणून त्यांनी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाकडे सप्टेंबर 2025 मध्ये रीतसर प्रकरण दाखल केले आहे.

यातील आरोपी लोकसेवक महेंद्र माने हे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ पुणे येथे जिल्हा व्यवस्थापक व आरोपी लोकसेवक संतोष शिंदे हे सहाय्यक लेखा अधिकारी म्हणून नोकरीस असून महामंडळाकडे लाथार्थ्यांनी दाखल केलेल्या प्रकरणांमध्ये साईट विजिट करून लार्भार्थ्यांकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन आरोपी लोकसेवक महिंद्र माने यांच्या शिफारशीनंतर ते प्रकरण अनुदान मंजुरीसाठी महामंडळाच्या विभागीय कार्यालयात पाठविण्याचे काम करतात.

वरील दोन्ही आरोपी लोकसेवकांनी तक्रारदाराने दाखल केलेल्या अनुदानाचे प्रकरण सकारात्मक शिफारशीसह महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाच्या विभागीय कार्यालयात पाठविण्यासाठी तक्रारदाराकडे 20 हजार रूपयाच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदाराने दिनांक 30 जानेवारी 2026 रोजी ॲंटी करप्शन ब्युरो, पुणे येथे दिली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार दिनांक 04/02/2026 व 05/02/2026 रोजी पडताळणी कारवाई केली असता नमुद दोन्ही आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे अर्जाप्रमाणे त्यांच्या अनुदानाची फाईल सकारात्मक शेरा मारून महामंडळाचे विभागीयकार्यालयात पाठविण्यासाठी तडजोडीअंती 15,000/- रूपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दि. 05/03/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आलोसे संतोष शिंदे यांनी 19:07 वाजता तक्रारदार यांचेकडून पुणे कॅफे समोर, अपोलो चौक, रस्ता पेठ येथे 15,000/- रूपये लाच रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. असून त्यानंतर आरोपी लोकसेवक महेंद्र माने यांना त्यांच्या राहत्या ठिकाणावरून 20:38 वाजता ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपी लोकसेवक यांच्याविरूद्ध समर्थ पोलीस ठाणे,पुणे शहर पोलीस आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

यातील आरोपी लोकसेवक महेंद्र मलेशा माने याच्याविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाणे, सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय, येथे गुरक्र. 779/2023 कलम 7 अ व 12 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल असून सध्या तो गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे)**, 9930997700 **(मुंबई)**
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट -** https://acb.maharashtra.gov.in
5) **ऑनलाईन तक्रार करणेसाठी** – https://acb.maharashtra.gov.in/bribe-compliant

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.